श्री. राजेश गुलाबचंद रायकवार तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, अमरावती यांना निलंबनातून मुक्त करुन शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत.....

संचालनालय लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
04 JUN 2025
प्राप्त झाले सही

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र. २३/कोषा-प्रशा-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ जून, २०२५

संदर्भ : १) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे आदेश क्र. संलेको-०४-२०२५/प्रशा-राप-सलेअ/टिस-४/३२७९/श्री. रायकवार /३११ /०२३३/१८८०, दिनांक २९.०४.२०२५
२) शासन आदेश क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र. २३/कोषा-प्रशा-१, दिनांक १६.०४.२०२५

**शासन आदेश**

श्री. राजेश गुलाबचंद रायकवार तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, अमरावती यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-४ च्या पोटनियम (१) मधील तरतूदीनुसार तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १२.०२.२०१३ मधील परिच्छेद-९(क) मधील तरतूदीनुसार संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या दिनांक ०६.०८.२०२४ च्या आदेशान्वये दिनांक २२.०७.२०२४ पासून निलंबित करण्यात आले आहे.

२. त्यानुषंगाने प्रशासकीय विभागस्तरावर गठीत करण्यात आलेल्या निलंबन आढावा समितीने श्री. राजेश गुलाबचंद रायकवार, तत्कालीन सहाय्यक लेखाधिकारी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, अमरावती यांचे निलंबन रद्द करुन त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्याची शिफारस दिनांक ०६.०३.२०२५ रोजी केली असून त्यानुसार श्री. रायकवार यांना शासनाच्या संदर्भाधीन दिनांक १६.०४.२०२५ च्या आदेशान्वये शासनसेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे.

सदर आदेशान्वये त्यांची सहायक लेखा अधिकारी, प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण मंच, धाराशिव या पदावर पदस्थापना करण्यात आली होती. तथापि श्री. राजेश गुलाबचंद

00696/2025/1026
05.06.2025

रायकवार यांच्या पदस्थापनेत प्रशासकीय कारणास्तव खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निलंबीत अधिकारी यांचे नाव, पदनाम व कार्यालय | मूळ महसूली विभाग | निलंबनापूर्वी कार्यरत असतांनाचा महसूली विभाग | निलंबन आढावा समितीची शिफारस विचारात घेऊन प्रस्तावित पुन:स्थापना /पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. राजेश गुलाबचंद रायकवार, तत्कालीन सहायक लेखा अधिकारी, सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती | अमरावती | अमरावती | महसूली विभाग- छत्रपती संभाजी नगर<br>सहायक लेखा अधिकारी, प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण मंच, हिंगोली. |

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. राजेश गुलाबचंद रायकवार सहाय्यक लेखाधिकारी (संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

प्रत-

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २ मुंबई/नागपूर
(२) महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र १ व २ मुंबई/नागपूर
(३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(४) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(५) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी , मुंबई*
(६) संचालक, लेखा व कोषागारे महाराष्ट्र मुंबई *
(७) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, अमरावती
(८) प्रबंधक , ग्राहक तक्रार निवारण मंच, हिंगोली *
(९) कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(१०) निवडनस्ती (कोषा-प्रशा-१)

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)